Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# बीड जिल्ह्यातील पाणलोट क्षेत्र विकास कामावर झालेला खर्चः एक अध्ययन

**प्रा. डॉ. राजपंगे एम.जी.**
भूगोल विभागप्रमुख,
आनंदराव धोंडे महाविद्यालय,
कडा, ता. आष्टी, जि. बीड

**प्रस्तावनाः**

पाणलोट क्षेत्र विकासाचे तत्व मान्य करुन महाराष्ट्र शासनाने जमीन आणि पाणी व्यवस्थापनासाठी आवश्यक असलेल्या सुधारणा पाणलोट क्षेत्राअंतर्गत शेतकऱ्यांना करुन देण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्रात भविष्यकाळात ३० टक्के क्षेत्र सिंचनासाठी आणण्याचा प्रयत्न महाराष्ट्र शासनाकडून केला जात आहे. प्रस्तुत प्रकरणात महाराष्ट्र शासनाने पाणलोट विषयक ज्या विविध योजना राबविलेल्या आहेत. त्याचा सविस्तर व विश्लेषणात्मक अभ्यास करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र पाणलोट विकास कार्यक्रम राज्याच्या निर्मितीनंतर शासनाने राज्याच्या विकासासाठी कृषी विषयक विविध योजना राबवल्या आहेत. त्यापैकी पाणलोट विकास कार्यक्रम ही एक महत्वपूर्ण योजना आहे. राज्याच्या सिंचन क्षमतेचा विचार करता राज्यातील बहुतांशी शेती पर्जन्यधारीत असल्यामुळे शेतीसाठी संरक्षीत जलसिंचनाची साधने निर्माण करणे, जमिनीची होणारी धूप थांबविणे, पडित जमिनीचा वापर करुन ग्रामीण भागातील उत्पन्नाची साधने वाढविणे यासाठी जलसंधारणाचा कार्यक्रम राज्यात अनेक योजनाद्वारे राबविण्यात येत आहे.

**बीड जिल्ह्यातील पाणलोट क्षेत्र विकास कामावर झालेला खर्चः**

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य व बीड जिल्ह्यातील जमिनीतील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी व जमीन कायम स्वरुपी सिंचनाखाली आणण्यासाठी वेगवेगळ्या योजनेअंतर्गत पाणलोट क्षेत्राची कामे केलेली आहेत. त्या कामावर केलेल्या खर्चाचा आढावा खाली तक्ता क्र. १ मध्ये दर्शविलेला आहे.

तक्ता क्र. १

**बीड जिल्ह्यातील पाणलोट क्षेत्रावर झालेला खर्च १९९२-२०११**

(खर्च लाख रुपयात)

| अ.क्र. | वर्षे | बीड जिल्हा | महाराष्ट्र राज्य | जिल्ह्याचे राज्याच्या खर्चाशी शेकडा प्रमाणे |
|---|---|---|---|---|
| १ | १९९१-९२ | ८८९.५५ | १४३९४.४५ | ६.१७ |
| २ | १९९२-९३ | ३२९६.५२ | २४८०७.२० | १३.२८ |

| अ.क्र. | वर्षे | बीड जिल्हा | महाराष्ट्र राज्य | जिल्ह्याचे राज्याच्या खर्चाशी शेकडा प्रमाणे |
|---|---|---|---|---|
| ३ | १९९३-९४ | ३६३०.१६ | ३४२८५.९६ | १०.५८ |
| ४ | १९९४-९५ | ७७१३.२३ | ६८८०९.९० | ११.२० |
| ५ | १९९५-९६ | ६१२४.९१ | ५९४७९.४३ | १०.२९ |
| ६ | १९९६-९७ | १४७१.१४ | ४४३५०.९१ | ०३.३१ |
| ७ | १९९७-९८ | ८३९.१० | ४९१४४.६३ | १.७० |
| ८ | १९९८-९९ | १७०८.०७ | ७६६२१.९५ | २.८४ |
| ९ | १९९९-२००० | १८९७.०१ | ५२९५५.५८ | २.४७ |
| १० | २०००-०१ | १८३१.१८ | ६६२२२.१४ | ३.४५ |

स्त्रोत - जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालय, बीड

तक्ता क्र. १ मध्ये बीड जिल्ह्यात व महाराष्ट्र राज्यात पाणलोट क्षेत्रावर सन २०००-०१ ते २०१२ या कालावधीमध्ये झालेला खर्च दर्शविलेला आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्याचा एकूण खर्च ६२६०८६.४९ लाख रुपये दिसून येतो. तर बीड जिल्ह्याचा ३१९८१.३२ लाख रुपये आहे. राज्याच्या तुलनेत तो खर्च (५.१०) टक्के खर्च २००१-०२ या साली ३२९६.५२ लाख रुपये त्याचे राज्याच्या खर्चाशी शेकडा प्रमाण (१३.२८) टक्के एवढा आहे. तर सर्वात कमी सन २०११-१२ या साली १९९२.११ लाख रुपये तो एकूण राज्याच्या खर्चाशी शेकडा (१.५९) टक्के एवढे दिसून येते. तसेच सन २००३-०४ या साली ७७१३.२३ लाख रुपये (११.२०) टक्के, २००२-०३ या साली ३६३०.१६ लाख रुपये (१०५८) टक्के, २००४-०५ या साली ६१२४.९१ लाख रुपये (१०.२९) टक्के, सन २००६-०७ या साली ८३९.१० लाख रुपये (१.७०) टक्के, २००९-१० या साली १८३१.१९ लाख रुपये (३.४५) टक्के, सन २००५-०६ मध्ये १४७१.१४ लाख रुपये (.३१) टक्के, २००७-०८ या साली १७०८.०७ लाख रुपये (२.८४) टक्के, २००८-०९ च्या साली १८९७.०१ लाख रुपये (२.४७) टक्के व सन २०१०-११ या साली १३८८.३४ लाख रुपये (२.०९) टक्के एवढा आहे.

तक्ता क्र. १ वरील अभ्यासावरून स्पष्ट होते की, बीड जिल्ह्यातील पाणलोट क्षेत्रावर २००१-०२ या वर्षासाठीच राज्याच्या तुलनेत सर्वात जास्त खर्च १३.२८ टक्के एवढा खर्च केल्याचे दिसून येते. या तुलनेत २००५-०६ पासून ते २०११-२०१२ (१० वर्षात) सदरील खर्चाची टक्केवारी कमी होत गेल्याचे स्पष्ट दिसून येते. बीड जिल्ह्यातील पाणलोट क्षेत्र विकास वाढवण्यासाठी व शेतीला पाणी पुरवठा

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

करण्यासाठी जमिनीतील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी, जमिनीची धूप थांबवण्यासाठी बीड जिल्ह्यात पाणलोट क्षेत्र विकासावर आणखीन खर्च करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते.

सन २००१-०२ या साली झलोला खर्च सर्वात जास्त १३.२८ टक्के तर सर्वात कमी २०११-१२ या साली १.५९ टक्के झालेला आहे. तसेच अनुक्रमे २००३-०४ साली ११.२० टक्के, २००२-०३ साली १०.५८ टक्के, २००४-०५ साली १०.२९ टक्के, २०००-०१ साली ६.१७ टक्के, २००६-०७ साली १.७० टक्के, २००९-१० साली ३.४५ टक्के, २००५-०६ साली ३.३१ टक्के, २००७-०८ साली २.८४ टक्के, २००८-०९ साली २.४७ टक्के व २०१०-११ साली २.०९ टक्के एवढा खर्च झाल्याचे दिसून येते.

बीड जिल्ह्यात पाणलोट क्षेत्र उपचारित कामे अनुदानाच्या स्वरुपात विविध योजनाच्या माध्यमातून केली गेली. जिल्ह्यात पाणलोट क्षेत्र विषयक राबवलेल्या १९९१-९२ ते २०१०-११ पर्यंत जिल्ह्यात राबवलेल्या सर्व योजनावरील झालेला खर्च तक्ता क्रमांक २ मध्ये दाखविण्यात आलेला आहे.

तक्ता क्र. २

**बीड जिल्ह्यात पाणलोट क्षेत्र विकासाच्या विविध योजनेवर झालेल्या खर्च (१९९१-९२ ते २०१०-११)**


(खर्च लाख रुपयात)

| अ. क्र. | योजना | २००१-२००२ | २००३-२००४ | २००४-२००५ | २००६-२००७ | २००७-२००८ | २००८-२००९ | २०१०-२०११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | राज्य पुरस्कृत योजना | उ.ना. | १२.४४ (०.१६) | ३३.४८ (०.५४) | ७५.२९ (५.११) | १२३६.६५ (७२.८०) | ९३०.९५ (५४.६१) | ९८३.०५ (४९.७६) |
| २ | केंद्र पुरस्कृत योजना | उ.ना. | ३९६.४१ (५.१३) | १८९.७ (३.०९) | ४७.५७ (३.२३) | १२३.२९ (७.२६) | ७७१.२८ (४५.२४) | ७२८.०९ (३६.८५) |
| ३ | जिल्हास्तर योजना | उ.ना. | ७३०५.०३ (९४.६९) | ५९०१.०६ (९६.३५) | १३४८.५७ (९१.६५) | ३३८.१३ (१९.९१) | २.४९ (०.१४) | २६४.२६ (१३.३७) |
| | एकूण | - | ७७१३.८८ (१००) | ६१२४.२३ (१००) | १४७१.४३ (१००) | १६९८.०७ (१००) | १७०४.७२ (१००) | १९७५.४० (१००) |

स्त्रोत : बीड जिल्हा मृद संधारण कामावरील खर्चाचा अहवाल सन १९९१-९२-२०१०-११

टीप : १) कंसातील आकडे ऐकोणाशी टक्केवारी दर्शवितात. २) उ.ना.=उपलब्ध नाही.

तक्ता क्र. २ मध्ये बीड जिल्ह्यातील पाणलोट क्षेत्र विकासाच्या विविध योजनावर झालेल्या खर्चाचा तपशील दर्शविलेला असुन त्यामध्ये राज्यपुरस्कृत योजना, केंद्र पुरस्कृत योजना व जिल्हास्तर योजना याची २००१-०२ ते २०१०-११ या कालावधीमध्ये केलेल्या खर्चाची माहिती दर्शविलेली आहे.


बीड जिल्ह्यात पाणलोट क्षेत्र विकासाच्या विविध योजनेवर झालेल्या खर्च
(१९९१-९२ते २०१०-११)
राज्य पुरस्कृत योजना
केंद्र पुरस्कृत योजना
जिल्हास्तर योजना
वर्ष

तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे सन २००१-०२ या वर्षी जिल्ह्यात सर्व योजनेवर केलेला एकुण खर्च ३३८३.२० लाख रुपये आहे. सन २००३-०४ या कालावधीमध्ये बीड जिल्ह्यात पाणलोट क्षेत्र विकासाच्या विविध योजनावर झालेला एकूण खर्च ७७१३.८९ लाख रुपये आहे. त्यामध्ये सर्वात जास्त जिल्हास्तर योजनावर ७३०५.०३ लाख रुपये (९४.६९) टक्के एवढा आहे. सर्वात कमी राज्यपुरस्कृत योजना यावर १२.४४ लाख रुपये (०.१६) टक्के व केंद्रपुरस्कृत योजना यावर ३९६.४१ लाख रुपये (५.१३) टककेे एवढा झाल्याचे दिसून येते.

तक्ता क्र.२ मध्ये दर्शविल्या प्रमाणे सन २००४-२००५ या वर्षात बीड जिल्ह्यात पाणलोट क्षेत्र विकासाच्या विविध योजनावर झालेला एकूण खर्च ६१२४.२३ लाख रुपये आहे. त्यामध्ये सर्वात जास्त जिल्हास्तर योजना ५९०१.०६ लाख रुपये (९६.३५) टक्के तर सर्वात कमी राज्य पुरस्कृत योजना ३३.४८ लाख रुपये (०.५४) टक्के एवढा आहे व केंद्र पुरस्कृत योजना १८९.७ लाख रुपये (३.०९) टक्के एवढा झाल्याचे दिसून येते.

सन २००६-०७ या वर्षात बीड जिल्ह्यात पाणलोट क्षेत्र विकासाच्या विविध योजनावर झालेला एकूण खर्च १४७१.४३ लाख रुपये यामध्ये सर्वात जास्त जिल्हा स्तर योजना १३४८.५७ लाख रुपये (९१.६५) टक्के तर सर्वात कमी केंद्रपुरस्कृत योजना ४७.५७ लाख रुपये (३.२३) टक्के एवढा आहे. तर राज्य पुरस्कृत योजना ७५.२९ लाख रुपये (५.११) टक्के एवढा झाल्याचे आढळून येते. सन २००७-०८ या वर्षात बीड जिल्ह्यातील पाणलोट क्षेत्र विकासाच्या विविध योजनावर झालेला एकूण खर्च १६९८.०७ लाख रुपये एवढा आहे. त्यामध्ये सर्वात जास्त राज्य पुरस्कृत योजना १२३६.६५ लाख रुपये (७२.८०) टक्के एवढा आहे. तर सर्वांत कमी केंद्रपुरस्कृत योजना १२३.२९ लाख रुपये (७.२६) टक्के एवढा आहे व जिल्हा स्तर योजना ३३८.१३ लाख रुपय (१९.९१) टक्के एवढा झाल्याचे दिसून येते.

सन २००८-२००९ या वर्षात बीड जिल्ह्यातील पाणलोट क्षेत्र विकासाच्या विविध योजनावर झालेल्या एकूण खर्च १७०४.७२ लाख रुपये एवढा आहे. त्यामध्ये सर्वात जास्त राज्य पुरस्कृत योजना ९३०.९५ लाख रुपये (५४.६१) टक्के एवढा आहे. तर सर्वात कमी जिल्हास्तर योजना २.४९ लाख रुपये (०.१४) टक्के एवढा आहे. तर केंद्र पुरस्कृत योजना ७७१.२८ लाख रुपये (४५.२४) टक्के एवढा झाल्याचे दिसून येते. तसेच तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे सन २०१०-११ या वर्षात बीड जिल्ह्यातील पाणलोट क्षेत्र विकासाच्या विविध योजनावर झालेला एकूण खर्च १९७५.४० लाख रुपये एवढा आहे. त्यामध्ये सर्वात जास्त राज्य पुरस्कृत योजना ९८३.०५ लाख रुपये (४९.७६) टक्के एवढा आहे. तर

सर्वात कमी जिल्हास्तर योजना २६४.२६ लाख रुपये (१३.३७) टक्के एवढा आहे. तर केंद्र पुरस्कृत योजना ७२८.०९ लाख रुपये (३६.८५) टक्के एवढा झाल्याचे दिसून येते.

तक्ता क्र. २ वरून असे दिसून येते की, पाणलोट क्षेत्र विकास कामांवर सन २००३-०४, २००४-०५ व २००६-०७ या वर्षात सर्वात अधिक खर्च जिल्हास्तर योजनावर अनुक्रमे ९४.६९ टक्के, ९६.३५ टक्के, ९१.६५ टक्के झालेला आहे. केंद्र व राज्य पुरस्कर योजनेत या कालावधीत केलेल्या खर्चाचे प्रमाण कमी दिसून येते. १९९१-२००८ ते २०१०-२०११ या काळात राज्यापुरस्कृत योजनेत केलेल्या खर्चाचे प्रमाणे वाढले असून ते एकूण खर्चाच्या अनुक्रमे ७२.८०, ५४.६१ व ४९.७६% दिसून येते. २००३-०४ ते २००७-०८ या काळात तुलनात्मक खर्चाच्या टक्केवारीचा विचार केल्यास सर्वात कमी खर्च केंद्र पुरस्कृत योजनेचा ३.२३% एवढा दिसून येतो.

**संदर्भ सूची :**

१. माधव चितळे (२०१०): महाराष्ट्र सिंचन सहयोग, सिंचन क्षेत्राच्या भावी विस्तारीत कक्षा, प्रिंटवेल इंटरनॅशनल, औरंगाबाद.
२. रामचंद्र मोरवंचीकर-पाणी टंचाईवर उपाय अमृत धारा, जलसाक्षरता २००६, धाराप्रिंटर प्रा.लि., मुंबई.
३. घारे, श्री. मुकूंद (२०००): सहभागी पाणलोटक्षेत्र विकास हस्तग्रंथ सहभागीय नियोजन-अफॉर्म प्रकाशन, नाशिक
४. सुर्यवंशी, अरूण (२००३): भूजलपुनर्भरण पध्दती, साकेत प्रकाशन औरंगाबाद
५. मृद्रा संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन विभाग, महाराष्ट्र शासन
६. मुसांडे, प्रा.देशमुख, प्रा.वराडे (२०००): पाणलोट क्षेत्रात पीक नियोजन, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
७. पांडव, रमेश (२०१०): जिरायत शेती, सिंचन साधना, प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि. औरंगाबाद.